# स्वातंत्र्यसैनिक सखाराम दादा पाटील: जीवन व कार्य

**प्रियांका राजाराम पाटील,** संशोधक विद्यार्थी, इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
priyasujit2607@gmail.com

---

**प्रस्तावना**

शिरोली दुमाला येथील स्वातंत्र्यसैनिक सखाराम दादा पाटील यांनी स्वातंत्र्यलढ्यात १९४२ मध्ये भाग घेतला होता. तसेच, स्वातंत्र्योत्तर कालखंडातही त्यांनी सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण काम केले. सामाजिक वनीकरण, अंधश्रद्धा निर्मूलन, व्यसनमुक्ती आणि फासेपारधी व कंजारभाट लोकांसाठी केलेले कार्य कोल्हापूर जिल्ह्याच्या सामाजिक चळवळीत महत्त्वाचे आहे. सखाराम दादा पाटील यांचा जन्म शिरोली दुमाला येथे २२ मार्च १९२८ ला झाला. शेतकरी व गरीब कौटुंबिक पार्श्वभूमीमुळे त्यांना व्हर्नाक्युलर परीक्षा व सेकंडरी टेंड (शिक्षकपदाची परीक्षा) एवढेच शिक्षण घेता आले. १९४६ मध्ये त्यांची साने गुरुजी यांच्याशी भेट झाली. त्यांच्या विचारांनी प्रेरित होऊन ते समाजसेवेकडे वळले.

**फासेपारधी व कंजारभाट समाज आणि अंधश्रद्धा**

१९५६ मध्ये सखाराम दादा पाटील यांनी फासेपारधी व कंजारभाट समाजाच्या लोकांसाठी उजळाईवाडीत शांतीनगर वसाहत स्थापन केली. फासेपारधी लोकांची कुलदैवत असलेल्या दुर्गामाता देवीची तीन वर्षांनी यात्रा असे. त्यात देवीला एक बकरे दिले जात असे. त्यांच्या जमातीचा जटा वाढविलेला एक देवर्षी रात्री बाराला देवीला देण्यासाठी आणलेले बकरे देवापुढे ठेवून त्याचे पाय बांधून निजवी. देवी देवर्षाच्या अंगात आली, की तो मोठ्याने ओरडत. त्या बकऱ्याच्या नरड्यात तापविलेली लोखंडी सळी खुपसत असे. नरड्यातून रक्त आल्यावर ते रक्त देवर्षी पीत असे व त्यावर तूप पीत असे. बकऱ्याचे हाल-हाल करून मारून त्याचे मटण शिजवून देवीला नैवेद्य दाखविला जात असे. देवर्षी भक्तांची गाऱ्हाणी ऐकून घेऊन त्यांच्या प्रश्नाचे उत्तर देई. देवीला कौल लावून देवर्षी लोकांकडून पैसे उकळीत असे. हे सर्व प्रकार बंद करण्यासाठी सखाराम दादा पाटील यांनी पुढाकार घेतला. त्या देवर्षाच्या त्यांनी जटा कापल्या. देव कोणाच्या अंगात येत नाही, हे सोंग तू करू नकोस, असे त्याला समजावून सांगितले. त्याप्रमाणे त्याने हा प्रकार बंद केला.

फासेपारध्यांच्या काही स्त्रिया जटा वाढवून आपल्या अंगात देवी येत आहे, असे लोकांना सांगून भिक्षा मागायच्या. अशा स्त्रियांच्या जटा सोडवून त्यांना उदरनिर्वाहासाठी सखाराम दादा पाटील यांनी शेती मिळवून दिली. त्यांना जोडधंदा म्हणून कोंबडीपालन करण्यास सांगितले. प्रत्येक कुटुंबाला सुधारित जातीच्या १० कोंबड्या व सुधारित जातीचा एक नर कोंबडा सरकारी अनुदानावर मिळवून दिला व त्यांचे भिक्षा मागणे बंद केले. फासेपारधी जमातीत त्यांच्याच लोकांनी त्यांची किरकोळ चोरी केली, की त्यांची पंचायत बसत असे. त्या पंचायतीत पंच त्यांना शिक्षा देत. किरकोळ चोरीला चोराला कच्चे तांदूळ व ज्वारी, हळद- कुंकू लावून खाण्यास देत. ते खाल्ल्यावर त्याला अपचन झाले तर त्याला १२ रुपये दंड करत. मोठ्या प्रमाणात चोरी झाल्यावर कोणाचा संशय असेल तर तापलेल्या कढईतल्या तेलात पैसा टाकून बाहेर काढण्यास सांगितला जात असे. त्याचा हात भाजला तर त्याने चोरी केली, असे समजले जात असे. त्याला फटके मारण्याची शिक्षा दिली जात असे. ही शिक्षा देण्याची प्रथा सखाराम दादा पाटील यांनी बंद केली.

फासेपारधी लोकांची लग्नाची पद्धत रानटी होती. लग्न ठरवावयाचे, हुंडा देणे-घेणे या पद्धती त्यांच्यात नव्हत्या. पंचांमध्ये लग्न ठरवावयाचे. लग्न ठरले की त्या नवऱ्या मुलाला मुलगी झाली की तिला सासरच्या घरात द्यायचे. मुलगी झाली नाही तर २०० रुपये द्यायचे. लग्नात मांडव नाही की बाशिंग नाही. पिंपळाच्या पानाला कापूस, हळद-कुंकू रंगवून व त्या मुंडावळ्या समजायच्या. हे बाशिंग नवऱ्या मुलाला व नवरी मुलीला बांधायचे. नवऱ्या मुलाने नवरी मुलीला खांद्यावर घेऊन पळत जायचे. त्याला सर्व जमातीने नवरी मुलगी नेली म्हणून उसाच्या पोसवाने मारावयाचे व लग्न झाले, असे समजावयाचे. ही रानटी चाल सखाराम दादा पाटील यांनी बंद करून मांडव घालून वैदिक पद्धतीने लग्न लावण्याची सुधारणा केली.

१९६० मध्ये सखाराम दादा पाटील यांनी शांतीनगर हौसिंग सोसायटी स्थापन करून फासेपारधी लोकांना घरे बांधून दिली. फासेपारधी व कंजारभाट लोकांना शेती करण्यासाठी शहराच्या आजूबाजूस पुष्कळ पडीक जमीन होती.

उजळाईवाडी, मुडशिंगी, नेर्ली तामगाव, हालसवडे येथे पूर्वी महाराजांनी पार्क म्हणून जमीन ठेवल्या होत्या. त्या जमिनी (४२० एकर) त्या वेळचे जिल्हाधिकारी यू. यू. शेख यांनी शाहू सामुदायिक सोसायटी काढण्यास सांगून फासेपारधी कंजारभाट लोकांना मिळवून दिल्या. सद्‌गुरू कामगार सोसायटीच्या माध्यमातून त्यांना रस्ता, खोदाईची कामे, पाइपलाईन घालण्याची, खडी फोडण्याची कामे मिळवून दिली. फासेपारधी लोक शेती उत्तम करू लागले. त्यांना शेतीचे तंत्रज्ञान त्यांच्या शेतावर प्रत्यक्ष जाऊन शेती कशी करावयाची, याची सखाराम दादा पाटील यांनी माहिती दिली. प्रत्येक कुटुंबास समाजकल्याण खात्याकडून सबसिडीवर एक म्हैस घेऊन दिली. काहींना सबसिडीवर बैलजोडी घेऊन दिल्या. सरकारी अनुदानातून शेतीची अवजारे, बी-बियाणे मिळवून दिले. काही लोक शेळीपालन करू लागले. त्यांनाही सरकारी अनुदान मिळवून दिले. त्यामुळे शेतीला जोडधंदा म्हणून दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन व शेळीपालन करू लागले.

**कामगारांना केले व्यसनातून मुक्त**

सखाराम दादा पाटील कुंभी कासारी साखर कारखाना व जिल्हा सहकारी दूध संघात नोकरीस असताना त्यांनी कामगारांचे वर्ग घेऊन त्यांना कोणकोणती व्यसने आहेत, याचे सर्वेक्षण केले. त्यात बरेच कामगार दारू पीत असल्याचे पाटील यांच्या निदर्शनास आले. दारूच्या व्यसनामुळे किती तोटे होतात, संसाराचे वाटोळे होते आणि दारूमुळे शरीराची हानी होते, हे त्यांना पटवून सांगितले. सखाराम दादा पाटील यांच्या प्रयत्नांमुळे बऱ्याच कामगारांनी दारू सोडली.

**श्री बलभीम वाचनालयाची स्थापना**

सखाराम दादा पाटील यांनी १९४७ मध्ये शिरोली दुमालात श्री बलभीम वाचनालय सुरू केले. साने गुरुजींचे सर्व वाङ्मय खरेदी केले. महात्मा जोतिराव फुले यांचे वाङ्मय, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची काही पुस्तके, हरी नारायण आपटे यांची पुस्तके, केसरी वृत्तपत्र, साधना साप्ताहिक, किर्लोस्कर मासिक वाचनालयात सुरू केले. लोकांना वाचनाची गोडी निर्माण केली. शेतीवर आधारित काही पुस्तके खरेदी केली. सखाराम दादा पाटील यांनी हे वाचनालय १९५३ पर्यंत चालविले. १९५३ मध्ये ते आजरा सर्वोदय योजनेत गेल्याने वाचनालय मराठी शाळेला दिले.

**जातीय द्वेष थांबविला**

३० जानेवारी १९४८ ला महात्मा गांधी यांची हत्या झाल्याने ब्राह्मणांची घरे पेटविण्यास सुरुवात झाली. शिरोलीत ब्राह्मणांची घरे पेटविण्यास शेजारच्या गावचे लोक आले. या वेळी सखाराम दादा पाटील यांनी त्यांना गावाबाहेर जाण्यास भाग पाडले व ब्राह्मण कुटुंबांची घरे जाळू दिली नाहीत. शंकर बाबाजी पाटील, महादेव गगाराम आडके आणि सखाराम दादा पाटील यांनी वादात पडलेला वाडा गावाच्या सार्वजनिक कामासाठी कामत बंधूंकडून गावासाठी मोफत लिहून घेतला. वाडा वादात १२ वर्षे पडल्याने बराच जीर्ण झाला होता. तो गावाच्या लोकवर्गणीतून दुरुस्त करून त्यात प्राथमिक आरोग्य केंद्र काढले. आता आरोग्य केंद्राची स्वतंत्र इमारत झाल्याने सरकारी इमारतीत प्राथमिक आरोग्य केंद्र स्थलांतरित झाले आहे. हा वाडा पाडून माजी आमदार संपतराव शामराव पवार पाटील, महादेवराव महाडिक यांच्या आमदार निधीतून सांस्कृतिक कार्यालय बांधण्यात आले.

**श्रमदानातून रस्ता आणि सावकारी फेऱ्यातून शेतकऱ्यांची सुटका**

आजरा तालुक्यातील आंवडी येथे 'सर्वोदय'च्या नोकरीत असताना आवंडी ते रायवाडा लोकांच्या श्रमदानाने दोन मैल रस्ता केला. सखाराम दादा पाटील यांनी लोकांना श्रमदानाचे महत्त्व पटवून दिले. यामुळे ग्रामस्थांनी रस्त्यासाठी १५ दिवस श्रमदान केले. आवंडी हे गाव डोंगराळ, अविकसित असल्याने लोक अत्यंत गरीब शेतमजूर होते. याचा फायदा सावकारांनी घेतला होता. ऑगस्टमध्ये पैसे कर्जाऊ द्यायचे आणि नोव्हेंबरमध्ये भात रूपाने परतफेड करायची. १९५४ मधील ही घटना आहे. आठ रुपये मण असा जिरग्या भाताचा दर ठरवून ऑगस्टमध्ये १०० रुपये दिले, तर त्याचे पाच महिन्यांचे व्याज ५० रुपये म्हणजे १०० रुपयांचे १५० रुपये व्हावयाचे. या आडमुठी व्याजाने तेथील शेतमजूर पिळून निघायचे. जे भात शेतात पिकेल, ते सावकराच्या घरात जायचे. शेतकरी, शेतमजूर कर्जाच्या फेऱ्यात अडकायचे म्हणून सखाराम दादा पाटील यांनी या गावात धान्य सोसायटी काढली. सुगीत धान्य गोळा करावयाचे आणि पावसाळ्यात त्याचे वाटप करावयाचे. व्याज धान्य रूपाने कमी ठेवले आणि सावकारी फेऱ्यातून शेतमजूर, शेतकऱ्यांची सुटका केली. शेतात भाजीपाला व रब्बी पीक घेण्याचे ज्ञान दिले. गावाला चित्री नदी असून, ती उंचीवरून वाहते. नदीला छोटा बंधारा घालून पाणी अडवून पाणी पाटाने आणून गावाची शेती बागायत केली.

**विनयकुमार छात्रालय व विद्यार्थी वसतिगृह**

शांतिनगरमध्ये कंजारभाट लोक दारूच्या हातभट्ट्या सुरू करून दारूचा धंदा करीत असत. दारूच्या भट्ट्यात ही मुले दारू काढण्यास मदत करीत आणि काही मुले दारू पिऊन शाळेलाही आल्याचे सखाराम दादा पाटील यांच्या निदर्शनास आले. येथे सुरू केलेल्या शाळेचा उपयोग झाला नाही म्हणून १९६० मध्ये कोल्हापुरात कोरगावकर ट्रस्टच्या ग्रामसेवा आश्रमात विनयकुमार छात्रालय सुरू केले. येथे कंजारभाट व फासेपारधी लोकांची ६० मुले आणली. या छात्रालयाला जोडून या मुलांसाठी विश्वभारती विद्यालय नावाची शाळा सुरू केली. छात्रालय व विश्वभारती विद्यालयासाठी प्रभाकरपंत कोरगावकर यांनी इमारती मोफत दिल्या. या छात्रालयातील मुले मोठ्या हुद्यावर काम कतीत आहेत. श्री तुळशी खोरे नावाचे विद्यार्थी वसतिगृह सुरू केले. १९६१ मध्ये शिरोली येथे शिरोली हायस्कूलची स्थापना केली.

**मुलींसाठी स्वतंत्र शाळा**

१९४७ मध्ये शिरोलीत मुलींची स्वतंत्र शाळा सुरू करण्याचे सखाराम दादा पाटील आणि भोसले गुरुजींनी ठरविले. शाळा अधिकारी जगदाळे यांना भेटलो आणि त्यांना स्वतंत्रपणे मुलींची शाळा सुरु करीत असल्याचे त्यांनी सांगितले. जगदाळे यांनी आमच्याकडे शिक्षिका नाहीत, तेव्हा शिक्षिका तुम्ही पाहा, त्यांचा पगार आम्ही देतो, असे सांगितले. एक विधवा बाई आक्कूबाई यशवंत लगारे इयत्ता चौथी उत्तीर्ण झालेल्या होत्या. सखाराम दादा पाटील यांनी त्यांना तीन वर्षांत सातवी उत्तीर्ण झाल्यावर कायम केले जाईल, असे सांगितले. त्याप्रमाणे त्या बाईंनी तीन वर्षांत सातवीचे शिक्षण पूर्ण केले व मुलींची शाळा चांगल्या प्रकारे चालविली.

**कोल्हापूर संस्थानच्या मदतीतून शाळा, प्रौढ साक्षरतेचे वर्ग**

कोल्हापूर संस्थानच्या खर्चातून दरबारा मदतीतून शिक्षणतज्ज्ञ बॅ. बाळासाहेब खर्डेकर यांनी शाळा सुरू केल्या आहेत, असे समजल्यावर सखाराम दादा पाटील हे बॅ. बाळासाहेब खर्डेकर यांना भेटले. शाळा सुरू करा, शिक्षकांचा पगार ग्रँट रूपाने वर्षाने मिळेल, असे बॅ. खर्डेकर यांनी सखाराम दादा पाटील यांना सांगितले. पाटील यांनी पंचक्रोशीत शिक्षणाचा प्रसार करून गणेशवाडी, सावरवाडी, हिरवडे, भाटणवाडी, सडोली, चाफोडी, गर्जन, आरळे, घानवडे, मांडरे, केकतवाडी परिसरात दरबार मदतीच्या शाळा काढल्या. त्यात शिक्षक नेमले व त्यांना दरबारमदतीची ग्रँट बॅ. खर्डेकरांच्या कोल्हापूर शिक्षण खात्याकडून मिळवून दिली. त्यांनी तीन वर्षे शाळा चालविल्यावर दरमहा पगार मिळवून दिला व त्या सर्व शाळा स्कूल बोर्डात तीन वर्षांनी वर्ग झाल्या. आवंडी येथे तसेच आवंडीपासून चार मैल जंगलात असलेल्या धनगरवाड्यावर शाळा सुरू केली. या दोन्ही शाळांतील मुलांना ते एकटेच शिक्षण देत होते. तेथील स्त्रियांना शिक्षण दिले. आरोग्य, स्वच्छता, मुलांचे संगोपन, दुग्ध व्यवसायाबद्दल मार्गदर्शनही केले. पावसाळ्यात आवंडीत मुक्काम करून ग्रामस्थांना रात्रीचे प्रौढ साक्षरतेचे वर्ग घेऊन शिक्षण दिले. या वर्गात दोन स्त्रिया धनगरांच्या होत्या.

**सामाजिक वनीकरण**

१९६२ मध्ये कुडित्रे येथील कुंभी कासारी सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष डी. सी. नरके आणि सखाराम दादा पाटील यांचा परिचय झाला. ते जिल्हाधिकारी कार्यालयात काही कामानिमित्त आले होते. ग्रामसेवा आश्रमात विनयकुमार छात्रालय होते. छात्रालयात कंजारभाट आणि फासेपारधी लोकांची ६० मुले शिक्षणास होती. त्यांची शाळा सुटल्यावर काही मुले खेळांच्या तासाला खेळ खेळत; तर काही मुले श्रमदानाच्या तासाला असत. आश्रमातील आमराईत हापूस, पायरी, नीलम वगैरे १०० आंब्यांची झाडे होती. सकाळी ३० मुलांना ३० मिनिटे कालावधीचा श्रमदानाचा तास आणि सायंकाळी शाळा सुटल्यावर ३० मुलांचा ३० मिनिटांचा तास असायचा. आश्रमातील एक एकर शेती प्रभाकरपंत कोरगावकर यांनी छात्रालयाला भाजीपाला करण्याकरिता दिलेली होती. आमराई एक एकर होती. या प्रत्येक आंब्याच्या झाडावर निपाणीच्या गोपीनाथ धारिया यांच्याकडून आणलेले पाच फूट दुधी भोपळ्याची आळी घातली होती. १० फूट लांब नेपाळी पडवळाचा मांडव, दीड फूट लांबीच्या कारल्याचे मांडव, तोंडल्याचे मांडव, माग्रलब टॉमॅटो, मांजरी गोटा वांगी, कृष्णाकाठची वांगी, एक गुंठ्यात मुलांच्या अंघोळीचे कपडे धुण्याच्या सांडपाण्यावर वि. स. खांडेकर यांच्याकडून कोकणातले आळू आणून लावले होते. कोल्हापुरात त्या वेळी मदनमोहन लोहिया आणि प्रभाकरपंत कोरगावकर या दोघांनी जयपूरहून आणलेले गुलाब होते. सखाराम दादा पाटील यांनी टाऊन हॉल बागेतील बापू माळी यांच्याकडे गुलाबाची कलमे कशी करावयाची, याचे ज्ञान घेतले होते. प्रभाकरपंत कोरगावकरांच्या बागेतील गुलाब आणून गुलाबाची बाग केली होती. डेलिया लावला होता. कोल्हापूर महापालिकेने

शहरातील मोकाट भटकी कुत्री मारण्याची मोहीम काढली होती. मृत कुत्री सायकलवरून आणून प्रत्येक आंब्याच्या झाडाला तीन फूट रुंदीची अळी करून प्रत्येक झाडाच्या बुंध्याखाली एक कुत्रे पुरले होते. आंब्याच्या झाडाला तीन फूट आळे करून त्या आळयात ताग पेरला होता. तागाला ४५ दिवसांत फुले आल्यावर त्या अळयात ताग गाडला आणि त्यावर सोनखत घातले. यामुळे आंब्यांच्या फळांना मोठा आकार आला होता. रंगही शेंद्री आला होता. भाजीपाला वेलाला भाज्यांची फळे लांब व टवटवीत आली होती. सखाराम दादा पाटील यांचे सर्व प्रयोग डी. सी. नरके यांनी पाहिले होते. त्यांनी पाटील यांना कुंभी कासारी साखर कारखान्यावर नोकरीस या, तुम्ही मागाल तो पगार तुम्हाला देतो, असे सांगितले. सखाराम दादा पाटील यांनी ही मुले आणून दोन वर्षे झाली आहेत, त्यांचे शिक्षण अर्ध्यावर टाकून साखर कारखान्यावर नोकरीस येता येणार नाही, असे सांगितले. १९७९ मध्ये छात्रालयातील सर्व मुलांचे शिक्षण पूर्ण करून विनयकुमार छात्रालय कोरगावकर ट्रस्टला दिले व ते शिरोलीला परतले. थोड्याच दिवसांत कुंभी कासारी साखर कारखान्यावर नोकरीस रुजू झाले. कारखान्याच्या सर्व परिसराची पाहणी केली. बैलगाडी तलावावर झाडे लावण्याचे काम सुरू केले. सिव्हिल खात्याकडून झाडांना खडे तीन फूट बाय तीन फूट खोदून घेतले. बैलगाडी तळावर दोन हजार झाडे लावली. कार्यालयासमोरची बाग तयार केली. १९८० मध्ये आंबा संशोधन केंद्र, वेंगुर्ला येथे दोन माळी बरोबर घेऊन १० दिवस आंब्याची कलमे आणली. मातृवृक्ष म्हणून आंब्याची २७ जातीची उत्तम कलमे आणली. १५ फुटांवर खड्डे मारून लागवड केली. खते देऊन दोन- आंब्याची कलमे मोठी झाली. गावठी आंब्याचे बाठे घालून १९८३ मध्ये तीन हजार आंब्यांची कलमे कारखाना सभासदांना दिली. पुढे दर वर्षी चार ते पाच हजार आंब्याची कलमे साखर कारखान्यावर करू लागलो. कारखाना नर्सरीमधून दरवर्षी निलगिरी, सुबाभूळ, बांबू, फणस, सीताफळे, रामफळे, शोभेची झाडे, जंगली झाडे शेतकरी-सभासदांना त्यांच्या शेतावर पोच केली. कारखान्याची रोपवाटिका नव्हती व शेतकरी सभासदांना लावण्यासाठी झाडेही देत नव्हते. सखाराम दादा पाटील यांनी शेतकरी सभासदांना २५ टक्के अनुदानावर फळझाडे व जंगली झाडे त्यांच्या शेतावर पोच केली.कारखाना कार्यक्षेत्रात शेतकरी- सभासदांना त्यांच्या शेतावर लावण्यासाठी कारखाना रोपवाटिकेतून सात लाखांच्या वर झाडांचे वाटप केले.

### सखाराम दादा पाटील यांना मिळालेले पुरस्कार

सखाराम दादा पाटील यांच्या सामाजिक, पर्यावरण संवर्धन व शैक्षणिक कार्याची दखल राज्य सरकार तसेच विविध सामाजिक संस्थांनीही घेतली. १४ एप्रिल २००३ ला सखाराम दादा पाटील यांना महाराष्ट्र शासनाने दलितमित्र पुरस्काराने गौरविले. १९ फेबुवारी २००७ ला राज्यस्तरीय दुसरा व पुणे विभागात पहिला वनश्री पुरस्कार प्रदान करण्यात आला. २००७ मध्ये स्वातंत्र्यसेनानी आणि बाबा तथा एल. वाय. पाटील प्रतिष्ठान, हुपरी यांच्यातर्फे पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. २००९ मध्ये राज्यस्तरीय शिव शाहू पुरस्कार, तर २०१८ मध्ये शाहीर रामचंद्र गुंडू महाजन चॅरिटेबल ट्रस्ट गौरव पुरस्काराने पाटील यांना सन्मानित करण्यात आले.

### निष्कर्ष

फासेपारधी व कंजारभाट समाजातील अंधश्रद्धा दूर करून समाजाला शिक्षणाच्या आणि आधुनिक युगाच्या प्रवाहात आणण्याचे काम सखाराम दादा पाटील यांनी केले. सामाजिक वनीकरणातून त्यांनी पर्यावरण संवर्धन चळवळीला बळ दिले. मुलींसाठी स्वतंत्र शाळा, प्रौढ साक्षरतेचे वर्ग, विद्यार्थी वसतिगृह या माध्यमातून त्यांनी शिक्षणाची गंगा सामान्य माणसापर्यंत तसेच परिघाबाहेर असलेल्या समूहापर्यंत पोचविली. कामगारांना व्यसनाचे तोटे समजावून सांगत व्यसनमुक्तीची चळवळ राबविली. ग्रामस्थांमध्ये श्रमदानाचे संस्कार रुजविले. शेतकऱ्यांची सावकारी पाशातून मुक्तता केली. सखाराम दादा पाटील यांचे विविध क्षेत्रांतील कार्य समाजाच्या विकासाला हातभार लावणारे ठरले.

### संदर्भ

१) अप्रकाशित आत्मकथन, पाटील सखाराम दादा, मु. पो. शिरोली दुमाला, ता. करवीर, जि. कोल्हापूर.
२) शिफारस पत्र, श्री. मेंडके लक्ष्मण दाजी, मु. पो. कसबा तारळे, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर. ता. २०/१०/ १९९०
३) शिफारस पत्र, श्री. पाटील आनंदराव पांडुरंग, मु. पो. परिते, ता. करवीर, जि. कोल्हापूर
४) दाखला, शांतिनगर को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड, शांतीनगर, उचगाव
५) शिफारस पत्र, श्री गोविंदराव कोरगावकर धर्मादाय संस्था, कोल्हापूर
६) मुलाखत, श्री. पाटील प्रतापसिंह बाळासाहेब (सखाराम दादा पाटील यांचे नातू). ता. २५ फेब्रुवारी २०२३